पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – ७५**
(सभावृत्तांत)

**दिनांक – ०८/०८/२०१८** **वेळ – दुपारी २.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक ०८/०८/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३. मा.राजू मिसाळ
४. मा.अमित राजेंद्र गावडे
५. मा.गावडे राजेंद्र तानाजी
६. मा.आंगोळकर सागर सुनिल
७. मा.करुणा शेखर चिंचवडे
८. मा.लोंढे नम्रता योगेश
९. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
१०. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
११. मा.लांडगे सारिका संतोष
१२. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१३. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१४. मा.बारणे अर्चना तानाजी
१५. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.आष्टीकर - अतिरिक्त आयुक्त (१) मा.गावडे - अतिरिक्त आयुक्त (२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.लांडे – मुख्य लेखापाल, मा.पाटील, मा.तुपे, मा.पठाण – सह शहर अभियंता, मा.झगडे,

मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.खोत, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.राऊत - सहाय्यक आयुक्त, मा.पवार – प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील – प्रचार्य, औ.प्र.कें., मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.चव्हाण, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.कांबळे, मा.गट्टुवार, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.घुबे, मा.सुपेकर, मा.देशमुख, मा.शेटीया - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.जगताप - कामगार कल्याण अधिकारी, मा.दांगट,– प्रशा.अधिकारी, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण), मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण), मा.माने – पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.२०) मा.स्थायी समिती सभेबाबत – मा.विलास मडिगेरी, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव

विषय क्र.२१) यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकरिता एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात सहा महिनेकरीता वरिष्ठ निवासी व कनिष्ठ निवासी पदावर निवड झालेल्या उमेदवारांची निवड व प्रतिक्षा यादी मान्यतेबाबत.

विषय क्र.२२) जिजाऊ पर्यटन केंद्र, भाग १ व २ पार्वती उद्यान देखभाल व संरक्षण करणेबाबत.

विषय क्र.२३) प्रभाग क्र.४१ सन २०१७-१८ साठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर व म्हात्मा फुले जयंती महोत्सवासाठी मंडप व्यवस्था करणेचे कामाचे सुधारित खर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.२४) प्रभाग क्र.२७ मोरवाडी येथील आनंदधाम स्मशानभुमीचे नुतनीकरणाचे काम करणे या कामाकरिता आर्किटेक्ट (वासतुविशारद) /प्रकल्प सल्लागार (PMC) नेमणूक करणे व फी अदा करणेबाबत.

विषय क्र.२५) पिंपरी चिंचवड महानगरपालिका व युनिट्रॅकसोल्युशन्स प्रा.लि. यांचे संयुक्त विद्यमान Recycling & Waste Expo 2018 चे योजनेसाठी ऑटो क्लस्रचे भाडे अदा करणेबाबत.

विषय क्र.२६) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये लावणेत येणा-या अनिधिकृत छोट्या जाहिराती (उदा.हॅंडबिल्स, कागदी भिंतीपत्रके इत्यादी) वर कारवाई करणेचे धोरण ठरविणेबाबत.

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.विलास मडिगेरी | अनुमोदक – मा. राजेंद्र गावडे

तामिळनाडूचे माजी मुख्यमंत्री एम.करूणानिधी यांचे दि.०७/०८/२०१८ रोजी दु:खद निधन झाले असून त्यांना आजच्या सभेत श्रध्दांजली वाहण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

----------

(मा.राजू मिसाळ, नगरसेवक, यांचे वाढदिवसा निमित्त मा.सभापती यांचे हस्ते त्यांचा सत्कार करणेत आला.

----------

दिनांक ०१/०८/२०१८ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ७४)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ३०१६ | विषय क्रमांक - १
दिनांक – ०८/०८/२०१८ | विभाग - क्रीडा
सूचक – मा.सागर आंगोळकर | अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.कुंदन गायकवाड, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव –

मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक सभा ठराव क्र.२३ दि.२७/७/२०१८ अन्वये संस्कृती महिला बचतगटामार्फत सन २०१६ पासून बळवंत चिंचवडे व्यायामशाळेची सेवाशुल्क तत्वावर देखभाल होत असून त्या बचतगटास ३ वर्षासाठी दरमहा सेवाशुल्क र.रु.२०००/- मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०१७ | विषय क्रमांक - २
दिनांक – ०८/०८/२०१८ | विभाग - क्रीडा
सूचक – मा.राजेंद्र गावडे | अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.कांबळे अंबरनाथ, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव –

मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक सभा ठराव क्र.२४ दि.२७/७/२०१८ अन्वये

प्रभाग क्र.१३ मधील यमुनानगर येथील अहिल्यादेवी होळकर उद्यानातील अहिल्यादेवी होळकर व्यायामशाळा सिध्दीविनायक मित्र मंडळ यमुनानगर या संस्थेस सेवाशुल्कावर चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०१८ विषय क्रमांक - ३
दिनांक – ०८/०८/२०१८ विभाग - क्रीडा
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.कांबळे अंबरनाथ, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव –

विषय - प्रभाग क्र.१३ मधील यमुनानगर बॅटमिंटन हॉल ११ वर्षाच्या कराराने प्रभागातील क्रांतिवीर मित्र मंडळ या संस्थेस मनपाचे पिंपळे गुरव,सांगवी या ठिकाणचा बॅटमिंटन हॉल कराराच्या धर्तीवर चालविण्यास देणेबाबत.

विषय क्र.३ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०१९ विषय क्रमांक - ४
दिनांक – ०८/०८/२०१८ विभाग - क्रीडा
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.कांबळे अंबरनाथ, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव –

मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक सभा ठराव क्र.२६ दि.२७/७/२०१८ अन्वये कासारवाडी येथील शारदा महिला व्यायामशाळा अभिनव गगन स्पोर्टस् क्लब,कासारवाडी या संस्थेला २ वर्ष कालावधीसाठी दरमहा सेवाशुल्क र.रु.२०००/- मनपाकडून देऊन सेवाशुल्क् तत्वावर चालविणेस देणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०२० विषय क्रमांक - ५
दिनांक – ०८/०८/२०१८ विभाग - क्रीडा
सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.कांबळे अंबरनाथ, मा.सुजाता पालांडे यांची शिफारस विचारात घेवून–

मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक सभा ठराव क्र.२७ दि.२७/७/२०१८ अन्वये डॉ.हेगडेवार क्रीडा संकुल मधील बॅडमिंटन हॉल, मासुळकर कॉलनी येथील बॅडमिंटन हॉल अभिनव गगन स्पोर्टस् क्लब, कासारवाडी या संस्थेला २ वर्ष कालावधीसाठी प्रतिमहा र.रु.१२,८५०/- आकारुन ११ महिने कालावधीसाठी भाडे कराराने भाडेतत्वावर चालविणेस देणेची मागणी असली तरी, डॉ.हेगडेवार क्रीडा संकुल मधील बॅडमिंटन हॉल, मासुळकर कॉलनी येथील बॅडमिंटन हॉल अभिनव गगन स्पोर्टस् क्लब, कासारवाडी या संस्थेला ५ वर्ष कालावधीसाठी प्रतिमहा र.रु.१२,८५०/- आकारुन ११ महिने कराराने भाडेतत्वावर चालविणेस देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०२१ विषय क्रमांक - ६
दिनांक – ०८/०८/२०१८ विभाग - क्रीडा
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.कांबळे अंबरनाथ, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव –

मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक सभा ठराव क्र.२८ दि.२७/७/२०१८ अन्वये प्रभाग क्र.१८ मधील दिनकर गजाबा भोईर व्यायाम शाळा महापालिकेच्या वतीने उत्कर्ष मित्र मंडळ या सामाजिक संस्थेला दरमहा सेवाशुल्क र.रु.२०००/- मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०२२ विषय क्रमांक - ७
दिनांक – ०८/०८/२०१८ विभाग - क्रीडा
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ – मा.संजय वाबळे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव –

मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक सभा ठराव क्र.२९ दि.२७/७/२०१८ अन्वये मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/०६/कावि/४०४/२०१४, दि.०३/११/२०१४ अन्वये पै.धोंडीबा ऊर्फ गणपत फुगे पाटील मैदान सॅडविक कॉलनी भोसरी हे मैदान व मैदान परिसरातील हॉल व व्यायाम शाळेसह शिवराज मुद्रा प्रतिष्ठाण भोसरी या संस्थेस दि.१९/१०/२०१३ ते दि.१८/०९/२०१४ अखेर ११ महिने कालावधीसाठी करारनामा करुन चालविण्यास देण्यात आला होता. सदर करारनाम्याची मुदत दि.१९/०९/२०१४ रोजी संपुष्टात आलेली आहे. मनपाकडे पै.धोंडीबा ऊर्फ

गणपत फुगे पाटील मैदान सॅडविक कॉलनी भोसरी हे मैदान व मैदान परिसरातील हॉल व व्यायाम शाळेतील मैदान याचा ताबा घेणेकामी कर्मचारी वर्ग अपुरा असल्यामुळे तसेच सुरक्षा कर्मचारी यांची मागणी करुनही त्यांचेकडून सुरक्षा कर्मचारी उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे पै.धोंडीबा ऊर्फ गणपत फुगे पाटील मैदान सॅडविक कॉलनी भोसरी हे मैदान व मैदान परिसरातील हॉल व व्यायाम शाळेसहीत याचा ताब्याची मुदत दि.१८/०९/२०१४ रोजी संपुष्टात येऊन सदर तारखेपासून हॉल व मैदान देखभाल दुरुस्तीकामी शिवराज मुद्रा प्रतिष्ठाण भोसरी यांच्या ताब्यात आहे. तरी सबब पै.धोंडीबा ऊर्फ गणपत फुगे पाटील मैदान सॅडविक कॉलनी भोसरी हे मैदान व मैदान परिसरातील हॉल व व्यायाम शाळेतील मैदान हे दि.१९/०२/२०१४ पासून शिवराज मुद्रा प्रतिष्ठाण भोसरी या संस्थेस देखभाल दुरुस्तीसह पुर्वीचे सेवाशुल्क् रक्कमेत वाढ न करता दरमहा र.रु.२५,०००/- सेवाशुल्क देऊन दि.१८/०९/२०१४ पासून १० वर्षे कालावधीकरिता करारनामा करुन सेवाशुल्क् तत्वावर चालविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०२३ विषय क्रमांक - ८
दिनांक – ०८/०८/२०१८ विभाग - क्रीडा
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.कांबळे अंबरनाथ, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव –

मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक सभा ठराव क्र.३० दि.२७/७/२०१८ अन्वये किवळे येथील रामभाऊ भिमाजी तरस ही व्यायामशाळा श्री.बापदेव महाराज स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित या संस्थेस ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर दरमहा र.रु.२०००/- मनपाकडून घेऊन चालविणेस देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०२४ विषय क्रमांक - ९
दिनांक – ०८/०८/२०१८ विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.अति. आयुक्त (१) यांचे जा.क्र.स्था/नि/क-मुख्य/१३०/२०१८ दि.३१/०७/२०१८

मा.अति. आयुक्त (१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.106/1/2017-18 अन्वये प्रभाग क्र.३५ भोसरी स.नं.१ मधील दवाखाना इमारतीसाठी बैठक व्यवस्था करणे व स्थापत्य विषयक कामे

करणेकामी मे.हरीषकुमार रामदास गायकवाड नि.र.रू.75,00,000/- (अक्षरी र.रु.पंच्याहत्तर लाख फक्त) पेक्षा 2.15% कमी दराने प्राप्त झालेली आहे. सन २०१७-१८ चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 5.64% कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने र.रू.73,38,750/- पर्यंत काम करून घेणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०२५ विषय क्रमांक - १०
दिनांक – ०८/०८/२०१८ विभाग – शिक्षण मंडळ कार्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी
संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जा.क्र.शिमं/९/कावि/१३७/२०१८ दि.०१/०८/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या प्राथमिक शाळांमध्ये इ.५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांकरीता सकाळ मिडीया प्रा.लि. यांनी दिनांक ७/४/२०१८ रोजीचे मा.आयुक्त सो. यांना सादर केलेल्या प्रस्तावानुसार सकाळ एनआयई (न्यूज पेपर इन एज्युकेशन) हा उपक्रम शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९ मध्ये राबविणेकामी प्रस्ताव सादर केला आहे. सदरचा उपक्रम थेट पध्दतीने करारनामा न करता यापूर्वी केला असून या वर्षीही करारनामा न करता थेट पध्दतीने करावा लागणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विविध कार्यशाळेचे आयोजन, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या जाणीवा जागृत करण्याच्या दृष्टीने तसेच लेखन कौशल्ये विकसीत करणे, तसेच शैक्षणिक वर्षात मनोंरजनातून ज्ञान देणा-या शाळानिहाय दोन कार्यशाळा आयोजित करणेत येणार आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना आयकार्ड, गिफ्ट किट, व सकाळ एनआयई अंक दरमहा दोन वेळा शाळेत वाटप करणेत येणार आहे. या उपक्रमामाध्ये गत वर्षी प्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाकडील प्राथमिक शाळांमध्ये इयत्ता ५ वी ते ७ वी चे ७५०० संख्या निश्चित करणेत आलेली असून या विद्यार्थ्यांना सभासद करुन सहभागी करुन घेणेत येणार आहेत. त्याकरीता प्रती विद्यार्थी र.रु.१००/- याप्रमाणे एकूण र.रु.७,५०,०००/- (अक्षरी र.रू. सात लाख पन्नास हजार फक्त) इतके सभासद शुल्क अपेक्षीत धरणेत येऊन त्यानुसार येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०२६ विषय क्रमांक - ११

दिनांक – ०८/०८/२०१८ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मातंवि/१२/कावि/१००/२०१८ दि.०२/०८/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

निविदा सूचना क्रमांक ३/२०१८-१९ नुसार लघुत्तम निविदाधारक मे. मेनस्ट्रीम सोल्युशन्स यांना महानगरपालिका मुख्य कार्यालय व इतर विविध कार्यालयांचे नेटवर्किंगचे दुरूस्ती व देखभालीचे कामकाज तीन वर्ष कालावधी करीता देण्यास तसेच त्यांचे सोबत कामाचा करारनामा करण्यास व त्यासाठी येणा-या प्रति वर्ष र.रू.४६,३०,१७९/- या प्रमाणे तीन वर्षाकरीता एकूण र.रू.१,३८,९०,५३७/-(अक्षरी र.रू. एक कोटी अडोतीस लाख नव्वद हजार पाचशे सदोतीस फक्त) अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.८०% ने कमी चे दरास व त्या अनुशंगाने येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०२७ विषय क्रमांक - १२

दिनांक – ०८/०८/२०१८ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे जा.क्र.मातंवि/११/कावि/४७६/२०१८ दि.२/८/२०१८

मा. मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

निविदा सूचना क्रमांक ०४/२०१८-१९ नुसार लघुत्तम निविदाधारक मे.टेक नाईन सर्व्हिसेस यांना ई-गव्हर्नन्स प्रकल्पांतर्गत विकसित करणेत आलेल्या आठ व नागरी सुविधा केंद्र संगणक प्रणाली अशा नऊ संगणक प्रणालींची देखभाल दुरूस्तीकामी १ वर्ष कालावधि करीता मनुष्यबळ उपलब्ध करणेचे कामकाज देण्यास तसेच त्यांचेसोबत कामाचा करारनामा करण्यास व त्यासाठी येणा-या र.रू.२२,४१,४५९/- (अक्षरी र.रू. बावीस लाख एक्केचाळीस हजार चारशे एकोणसाठ फक्त) सर्व करांसहीत अंदाजपत्रकीय दारपेक्षा -१.२९% ने कमी चे दरास व त्या अनुशंगाने येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०२८ विषय क्रमांक - १३
दिनांक – ०८/०८/२०१८ विभाग – अ क्षेत्रीय, आरोग्य
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जा.क्र.अक्षेका/आ/२/कावि/३९०/२०१८ दि.३१/०७/२०१८

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालय आरोग्य विभागाचे विषयांकित कामास निविदा प्रतिसाद करूनही अत्यल्प प्रतिसाद मिळाले (एकही निविदा प्राप्त न झालेने) ब क्षेत्रीय कार्यालयाकडील निविदा नो.क्र.१/२०१८-२०१९ च्या मंजूर दराने म्हणजे र.रू.४१४/- च्या ४८.७९% कमी दराने म्हणजे र.रू.२१२/- या दराने स्विकारण्यात आलेल्या मंजूर दराने ठेकेदारास पत्र देणेत तातडीकामी कळविले असून करारनामा सिल झाला असल्याने विषयाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०२९ विषय क्रमांक - १४
दिनांक – ०८/०८/२०१८ विभाग - लेखा
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/३/कावि/२४०/२०१८ दि.०३/०८/२०१८

विषय - पीएमपीएमएल संस्थेस संचलनतूट व विविध प्रकारचे पासेसपोटी ऑगस्ट २०१८ ची रक्कम अदा करावयाचे रकमेस मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.१४ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०३० विषय क्रमांक - १५
दिनांक – ०८/०८/२०१८ विभाग - लेखा
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/१/कावि/८९३५/२०१८ दि.०४/०८/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

आदेश क्र.लेखा/१३अ/कावि/५७२/१८ दि.२३/५/१८ अन्वये सर्व विभाग प्रमुख/ शाखाप्रमुख यांना वित्तीय अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. सदर आदेशातील काही त्रुटी दूर करण्यासाठी खालील प्रमाणे दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

| अ.क्र | आदेशातील अ.क्र. | दि. २३/५/२०१८ च्या आदेशातील मजकूर | दुरूस्ती करावयाचा मजकूर |
|---|---|---|---|
| १ | १३- सर्व क्षेत्रिय अधिकारी , क्षेत्रिय कार्यालय | १) अभियांत्रिकी स्वरुपाची कामे वगळून र.रु १०,००,०००/- कमाल मर्यादेपर्यंतच्या कामांना/खर्चाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे व संबंधित कामांसाठी निविदा मागवून अटी व शर्ती निर्धारित करुन स्वाक्षरी करणे, करारनामा करणे, देयके अदा करणे | र.रु. ५ लक्ष ते र.रु १० लक्ष पर्यंतची विकास कामे, देखभाल दुरुस्ती कामे व खरेदी साठी प्रशासकीय व वित्तीय मंजूरीचे अधिकार क्षेत्रिय अधिकारीयांना राहतील. |
| २ | -- | -- | र.रु ० ते र.रु. ५ लक्ष पर्यंतची विकास कामे, देखभाल दुरुस्ती कामे व खरेदी साठी प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २९ - अ पोटकलम ७ (क) नुसार प्रभाग समितीला आहेत. |

उपरोक्त प्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने दिनांक २३/५/२०१८ च्या वित्तीय अधिकार प्रदान आदेशा सोबतचे परिशिष्ठ 'अ' मधील अनुक्रमांक ५ नुसार सर्व क्षेत्रिय कार्यालयाकडील कार्यकारी अभियंता यांनाअभियांत्रिकी स्वरुपाच्या कामांकरिता र.रु.१० लक्ष कमाल मर्यादेपर्यंतच्या खर्चाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबतचे अधिकार काढून घेणे आवश्यक आहे. तरी वरील प्रमाणे वित्तीय अधिकार प्रदानात दुरूस्ती करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६८ व ६९ नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०३१ विषय क्रमांक - १६

दिनांक – ०८/०८/२०१८ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.अति. आयुक्त (२) यांचे जा.क्र.पअक/१/कावि/२०९/२०१८ दि.३/०८/२०१८

मा. अति. आयुक्त (२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV23/1-2017-18 अन्वये पिंपरी चिंचवड मनपा परिसरातील अ ब आणि फ पंपीग स्टेशनमधील स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.नरळे विष्णु विठोबा यांचेकडुन नि.र.रु.६२,९७,६५१/- (अक्षरी र.रू.बासष्ठ लाख सत्याण्णव हजार सहाशे एक्कावन्न फक्त) पेक्षा -२८.२६% कमी या दराने प्राप्त झालेली आहे. सदर ठेकेदारांकडून निविदा मंजूर दराने र.रु.४५,१७,९३५/- पर्यंत काम करुन घेणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०३२ विषय क्रमांक - १७

दिनांक – ०८/०८/२०१८ विभाग – स्थापत्य उद्यान

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था.उ/कावि/२०५/२०१८ दि.०४/०८/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

स्थापत्य उद्यान विभागाकडे सध्या विविध विकास कामे चालू आहेत. शहराची पर्यटन नगरीकडे वाटचाल करणेसाठी शहरामधील विविध भागातील ताब्यात आलेल्या उद्यानांच्या जागा यांची नागरी सुविधा व त्या अनुषंगाने विकास करणे आवश्यक आहे. त्यामुळे शहराचा सांस्कृतिक व धार्मिक वारसा जतन होईल तसेच शहराचे सुशोभीकरण होईल. सेंट ऍन्थोनी उद्यान, कै.पु.ल.देशपांडे उद्यान, संत शिरोमणी सावता माळी उद्यान व प्रभाग क्र.२० मधील इतर उद्यानांचे नुतनीकरण करणेसाठी शेल्सस्पेस डीझाइन स्टूडीओ यांना म.न.पा नियमानुसार फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०३३ विषय क्रमांक - १८

दिनांक – ०८/०८/२०१८ विभाग – स्थापत्य EWS प्रकल्प

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/मुख्य/३६५/२०१८ दि.०४/०८/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

केंद्रशासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेमार्फत आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी बो-हाडेवाडी येथे निवासी गाळे बांधणेकामी रक्कम रु.११०,१३,७०,७६२/- ची निविदा क्र.स्थापत्य मुख्यालय/९८/१/२०१७-१८ नुसार दि.१२/०२/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदा भरणेची अंतिम मुदत दि.२३/०२/२०१८ पर्यंत होती. सदर निविदा दि.२1/०3/२०१८ रोजी उघडणेत आली. त्यामध्ये खालील ठेकेदारांनी निविदा सादर केल्या आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | ठेकेदाराचे नाव | प्राप्त दर र.रु. | लघुत्तम अनुक्रम |
|---|---|---|---|---|
| १ | प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत बोऱ्हाडेवाडी गट.नं.१६५पै, १६८पै व १७१पै येथे १२८८ सदनिका बांधणे. | **<u>मे.एस.जे.कॉन्ट्रॅक्टस् प्रा.लि.</u>** | १३४,३६,७२,३३०/- | L१ |
| | | मे.करण बिल्डर्स | १३९,८७,४०,८६८/- | L२ |
| | | मे. बेंचमार्क रिअँलिटी एलएलपी | १४३,१७,८१,९९१/- | L३ |

त्यामध्ये लघुत्तम निविदा ठेकेदार मे.एस.जे.कॉन्ट्रॅक्टस् प्रालि. यांचेकडून प्राप्त झाली. सदर ठेकेदार यांनी दिलेला दर हा र.रु.१३४,३६,७२,३३०/- (अक्षरी र.रु.एकशे चौतीस कोटी छत्तीस लाख बाहत्तर हजार तीनशे तीस फक्त) इतका आहे. म्हणजेच निविदा र.रु.११०,१३,७०,७६२/- या रकमेपेक्षा सदर दर र.रु.२४,२३,०१,५६८/- जादा आहे. मे.एस.जे.कॉन्ट्रॅक्टस् प्रालि.यांना दि.१९/०६/२०१८ रोजीचे पत्रान्वये दर कमी करुन सुधारीत दर देणेबाबत पत्र दिले असता ठेकेदार यांनी दि.१९/०६/२०१८ रोजीचे पत्रान्वये सदरच्या कामाची सुधारीत किंमत र.रु.१२३,७८,३७,८९४/- इतकी सादर केलेली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सन २०१७-१८ च्या दरसूचीत (SSR नुसार) टेस्टींग चार्जेस, आर.सी.सी.डिझाईन चार्जेस, जी.एस.टी, सिमेंट स्टील फरक व रॉयल्टी चार्जेससह सदर कामाची किंमत र.रु.१२१,१९,०३,१६५.७०/- इतकी येत आहे. ठेकेदाराने दि.१९/०६/२०१८ रोजीचे पत्रान्वये सदर कामाची सुधारित किंमत र.रु.१२३,७८,३७,८९४/- इतकी कळविलेली आहे. सदर रक्कम ही SSR २०१७-१८ नुसार निविदा र.रु.१२१,१९,०३,१६५.७०/- पेक्षा र.रु.२,५९,३४,७२८/- जादा म्हणजेच निविदा स्विकृत दरापेक्षा २.१४% जादा आहे. मा.स्थायी समितीने ठराव क्र.२१६१, दि.१८/०७/२०१८ रोजीचे ठरावान्वये मा.आयुक्त यांनी सदरचा विषय तपासून फेरसादर करावा असा ठराव पारित केलेला आहे. तसेच मा.आमदार, श्री.लक्ष्मण पांडुरंग जगताप यांनी दि.०६/०७/२०१८ रोजी पुढील आशयाचे पत्र दिलेले आहे. “प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी जी घरे बांधण्यात येणार आहेत, या सदनिकेच्या दरामध्ये आणि पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने प्रस्तावित केलेल्या स्वस्त घरकुल योजनेमधील सदनिकांच्या दरामध्ये तफावत आढळून येते. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांचेकडून स्वस्त घरकुल योजनेमधील सदनिकांच्या जमिनीच्या २५% किंमत लाभार्थ्यांकडून घेवून देखील सदनिकांच्या किंमती कमी आह्त. मनपानेही फक्त जागेची किंमत व मनपा डेव्हलपमेंट चार्ज किंवा २ लाख रुपये इतकाच आर्थिक भार सोसावा”. मा.स्थायी समितीने ठराव क्र.२१६१, दि.१८/०७/२०१८ अन्वये मा.आयुक्त यांनी सदरचा विषय तपासून फेरसादर करणेविषयीचा ठराव पारित ठराव तसेच मा.आमदार यांचे पत्र विचारात घेता पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणातर्फे पेठ क्र.१२ येथे निवासी गाळे बांधण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. सदर प्रकल्पात एकूण सुमारे ४९०० निवासी गाळे बांधण्याचे प्रस्तावित आहेत. सदर निविदा व मनपाची निविदा यामध्ये तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणामार्फत काढणेत आलेल्या निविदांचा तुलनात्मक तक्ता. (GST, टेस्टींग चार्जेस, आर.सी.सी.डिझाईन चार्जेस, सिमेंट व स्टील फरक, रॉयल्टी वगळून)

| **संस्थेचे नाव** | **प्रकल्पाचे ठिकाण** | **एकुण सदनिका** | **निविदा रक्कम रु. SSR नुसार** | **Carpet Area चौ.फुट मध्ये** | **प्रति चौ.फुट दर रु.** | **प्रति सदनिका दर रु.** |
|---|---|---|---|---|---|---|
| पिंपरी चिंचवड महानगरपालिका | बो-हाडेवाडी | १२८८ | १०४८२८८८०३.७९ | ४१५७६६.४० | २५२१.३४ | ८१३८८८ |
| पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण | सेक्टर १२ | २५७२ | २५९०६०८०११ | १०६७३४५.७२ | २४२७.०० | ७८३४८३ |

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांचेमार्फत काढणेत आलेल्या निविदांना ठेकेदार यांनी भरलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे. (GST, टेस्टींग चार्जेस, आर.सी.सी.डिझाईन चार्जेस, सिमेंट व स्टील फरक, रॉयल्टी सहीत)

| संस्थेचे नाव | प्रकल्पाचे ठिकाण | एकुण सदनिका | GSTव इतर चार्जेस प्रमाणे आलेला SSR दर | ठेकेदार यांनी सादर केलेला दर | Carpet Area प्रति चौ.फुट दर रु. | प्रति सदनिका दर रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| पिंपरी चिंचवड महानगरपालिका | बो-हाडेवाडी | १२८८ | १२११९०३१६५.७० | १२३७८३७८९४ | २९७७.०० | ९६१०५४ |
| पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण | सेक्टर १२ | २५७२ | ----------------- | ८२५१४८.१६ (प्रति सदनिका) | २५९९.५४ | ८२५१४८ |

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांचे निविदेमध्ये Infrastructure च्या कामांचा समावेश असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दरामध्ये Infrastructure च्या अंदाजपत्रकाचा समावेश करुन प्रति सदनिका दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| संस्थेचे नाव | प्रकल्पाचे ठिकाण | एकुण सदनिका | ठेकेदार यांनी सादर केलेला दर | Infrastructure कामांची अंदाजपत्रकीय किंमत | एकुण किंमत (Civil + Infra) | Carpet Area प्रति चौ.फुट दर रु. | प्रति सदनिका दर रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पिंपरी चिंचवड महानगरपालिका | बोऱ्हाडेवाडी | १२८८ | १२३७८३७८९४ | ४९४७४००० | १२८७३११८९४ | ३०९६.०० | ९९९४६५ |
| पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण | सेक्टर १२ | २५७२ | ८२५१४८.१६ (प्रति सदनिका) | - | ८२५१४८.१६ (प्रति सदनिका) | २५९९.५४ | ८२५१४८ |

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडील निविदा व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडील निविदा यामध्ये तुलना केली असता प्राधिकरणाच्या निविदेत भिंतींच्या अंतर्गत Plaster साठी Wallcare Putty या Item चा समावेश आहे तर मनपाच्या निविदेत Gypsum Plaster या Item चा समावेश करण्यात आलेला आहे. Wallcare Putty च्या तुलनेत Gypsum Plasterहे Long

Life, Smooth Finishing व Attractive आहे. प्राधिकरणाच्या निविदेतील MS Windows च्या ऐवजी मनपाने Aluminium Windows घेतलेल्या आहेत. तसेच मनपाच्या निविदेत Name Plate, Flat Common Name Plate, GI Letter Box, Building Name, इ. अतिरिक्त बाबींचा समावेश आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांचेमार्फत तयार करणेत आलेल्या अंदाजपत्रकामधील Items चा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| Sr.No. | Item | PCMC Qty | Unit | PCMC Amount | | Item | PCNTDA Qty | Unit | Rate | PCNTDA Amount | Saving / Excess Cost (3X10) | Difference with PCMC Estimate (5-12) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 1 | **Gypsum Plaster** | **165049.872** | **Sqm** | **100049166.9** | | **Wallcare Putty** | **436315.76** | **Sqm** | **108.22** | **47218091.55** | **17861697.15** | **82187469.7** |
| 2 | Aluminium openable Window | 8336.13 | Sqm | 37632535.07 | | MS Window | 20530.19 | Sqm | 3662.84 | 75198801.14 | 35854551.79 | 6132142.9 |
| 3 | Aluminium Louvered Window | 1452.6 | Sqm | 4354159.62 | | | | | | | | |
| | **Total** | **9788.73** | | **41986694.69** | | | | | | | | |
| 4 | MS Ralling | 1051.68 | Sqm | 1782285.42 | | SS Railing | 11191.84 | Sqm | 1931.35 | 21615360.18 | 2031162.168 | -248876.748 |
| 5 | Internal Painting - (Oil Paint) | 22931.244 | Sqm | 1637204.17 | | OBD | 2261.896 | Sqm | 58 | 131189.968 | 1330012.152 | 307192.018 |
| 6 | Texture Paint | 100517.97 | Sqm | 13921460.28 | | External 6mm plaster | 233928.55 | Sqm | 154.24 | 36081139.55 | 38591864.22 | -24670403.9 |
| | | | | | | External Acrylic Paint | 233928.55 | Sqm | 229.69 | 53731048.65 | | |
| | | | | | | **Total** | | | **383.93** | **89812188.2** | | |
| 7 | Name Plate 300x75 | 1342 | No | 119290.38 | | - | - | - | - | - | | |
| 8 | Flat Common Name Plate | 6 | No | 12578.64 | | - | - | - | - | - | | |
| 9 | GI Letter Box | 1342 | No | 337606.94 | | - | - | - | - | - | | |
| 10 | Building Name | 30.24 | Sqm | 13947.29 | | - | - | - | - | - | **SAVING** | **88626804.6** |

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, फक्त मनपाने घेतलेल्या Gypsum प्लास्टर चा Item ची किंमत र.रु.१०,००,४९,१६६/- (GST, डिझाईन चार्जेस वगळून) इतकी आहे. व प्राधिकरणाच्या items च्या दरांशी तुलना करता सदर Item मुळे येणारा फरक र.रु.८,२१,८७,४६९/- इतका आहे. त्यामुळे मनपाच्या निविदेतील Gypsum प्लास्टर चा Item वगळल्यास सदर निविदेची रक्कम १० कोटी इतकी कमी होऊ शकेल, व सदर Item वगळल्यामुळे फक्त इमारतीच्या आतील बाजूच्या फिनिशिंगमध्ये थोडासा फरक पडेल पण इमारतीच्या Structural Stability वर कोणताही फरक पडणार नाही. तथापि Aluminium Windows चा item मात्र तसाच ठेवणे योग्य होईल. सदर Gypsum प्लास्टर चा Item अंदाजपत्रकामधून वगळल्यास येणारा प्रति सदनिका व प्रति चौ.फुट दराचा तक्ता (Civil + Infra) खालील प्रमाणे.

| संस्थेचे नाव | प्रकल्पाचे ठिकाण | एकुण सदनिका | ठेकेदार यांनी सादर केलेला दर | Infrastructure कामांची अंदाजपत्रकीय किंमत | एकुण किंमत (Civil + Infra) | Gypsum Plaster Item ची एकुण रक्कम (GST सहीत) | Gypsum Plaster वगळल्यास येणारी रक्कम | प्रति चौ.फुट दर रु. | प्रति सदनिका दर रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पिंपरी चिंचवड महानगरपालिका | बोऱ्हाडेवाडी | १२८८ | १२३७८३७८९४ | ४९४७४००० | १२८७३११८९४ | ११३०५५५५९ | ११७४२५६३३५ | २८२४.३२ | ९११६९० | |
| पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण | सेक्टर १२ | २५७२ | ८२५१४८.१६ (प्रति सदनिका) | - | ८२५१४८.१६ (प्रति सदनिका) | - | - | २५९९.५४ | ८२५१४८ | ठेकेदार यांनी सदरची निविदा सदनिका किंमतीच्या ७.३९% कमी दराने भरलेली आहे. |

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये Gypsum प्लास्टर चा Item वगळल्यास येणारा प्रति सदनिका व प्रति चौ.फुट दर पुढीलप्रमाणे (SSR नुसार)

| संस्थेचे नाव | प्रकल्पाचे ठिकाण | एकुण सदनिका | SSR २०१७-१८ नुसार कामाची किंमत (GST व इतर चार्जेस सहीत) | Gypsum Plaster Item ची एकुण रक्कम (GST सहीत) | Gypsum Plaster वगळल्यास येणारी रक्कम | प्रति चौ.फुट दर रु. | प्रति सदनिका दर रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पिंपरी चिंचवड महानगरपालिका | बोऱ्हाडेवाडी | १२८८ | १२११९०३१६६ | ११३०५५५५९ | १०९८८४७६०७ | २६४२.९४ | ८५३१४३ |

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये समाविष्ठ असलेला Gypsum प्लास्टर चा Item वगळल्यास प्रति सदनिका दर र.रु.८,५३,१४३/- व प्रति चौ.फुट दर र.रु.२६४२.९४/- इतका येत आहे. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या निविदेतील इमारती या P+11 मजली असून मनपाच्या निविदेतील इमारती या P+14 मजली आहेत. तीन मजले वाढल्यामुळे मनपाचा वाढणारा खर्च र.रु.७५/- प्रति चौ.फू. इतका आहे. तसेच पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडील निविदा ठेकेदार यांनी ७.३९% कमी दराने भरलेली आहे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची निविदा ठेकेदाराने २.१४% जादा दराने भरलेली आहे. उपरोक्त प्रमाणे Gypsum प्लास्टर चा Item वगळण्यास व ठेकेदार यांना Gypsum प्लास्टर चा Item र.रु.११,३०,५५,५५९/- वगळून र.रु.१०९,८८,४७,६०७/- या दरानुसार ठेकेदार यांना दर कळविणेबाबत पत्र देण्यास मा.आयुक्त यांनी दि.३१/०७/२०१८ रोजीचे प्रस्तावान्वये मान्यता दिली आहे. त्यास अनुसरुन ठेकेदार यांना दि.३१/०७/२०१८ रोजी निविदेमधील Gypsum प्लास्टर चा Item र.रु.११,३०,५५,५५९/- वगळून काम करणेस सहमती असल्यास सदर कामाचा सुधारीत दर सादर करणेविषयी कळविले आहे. ठेकेदार यांनी दि.०१/०८/२०१८ रोजी निविदेमधील Gypsumप्लास्टर चा Itemवगळून काम करणेस सहमती दर्शवून सदर कामाचा सुधारीत किंमत र.रु.112,19,23,406/-

एवढी कळविली आहे. मे.एस.जे.कॉन्ट्रॅक्टस् प्रालि.यांनी दि.१/०८/२०१८ च्या पत्रान्वये Gypsum प्लास्टर चा Item वगळून कळविलेल्या कामाची सुधारीत किंमत र.रु.112,19,23,406/- ही SSR २०१७-१८ नुसार Gypsum प्लास्टर चा Item वगळून येणा-या निविदा र.रु.१०९,८८,४७,६०७/- पेक्षा र.रु.2,30,75,799/- जादा म्हणजेच निविदा स्विकृत दरापेक्षा 2.10% जादा आहे. सदरचे कामासाठी मे.एस.जे.कॉन्ट्रॅक्टस् प्रालि. यांचे दि.०१/०८/२०१८ च्या पत्रान्वये कळविलेल्या सुधारीत किंमत र.रु.112,19,23,406/- निविदा स्विकारणेस मा.आयुक्त सो यांनी दि.४/८/२०१८ रोजीचे प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे. परंतु सदर कामाच्या DPR ला राज्य शासनाच्या राज्यस्तरीय मुल्यमापन समितीने (SLAC) व राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समितीने (SLSMC) मान्यता दिली आहे. तसेच केंद्र शासनाच्या केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने (CSMC) मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पास महाराष्ट्र शासन र.रु.1 लक्ष व केंद्र शासन र.रु.1.5 लक्ष अनुदान देत आहे. निविदेतील अंदाजपत्रकामधील Gypsum Plaster चा Item कमी केल्यामुळे DPR किमतीमध्ये बदल होत आहे. तो बदल शासनाच्या निदर्शनास आणुन त्याला मान्यता घेणे गरजेचे आहे. तसेच सदर कामास सुधारित तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. वरील पुर्ततेच्या अधिन राहून Scope कमी करुन सुधारित निविदा दर र.रु.112,19,23,406/- मंजूर करणे अथवा मुळ निविदा दर र.रु.123,78,37,894/- मंजूर करणे कामी सदरचा विषय निर्णयार्थ सादर. कामाचे आदेश देणेपुर्वी या बाबींची पुर्तता करणे गरजेचे आहे. तरी वरील प्रमाणे काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०३४ विषय क्रमांक - १९

दिनांक – ०८/०८/२०१८ विभाग - नगरसचिव

सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.नगरसचिव यांचे जा.क्र.नस/१/कावि/७१७/२०१८ दि.०४/०८/२०१८

मा.नगरसचिव यांनी शिफारस केले प्रमाणे –

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ३०३५ विषय क्रमांक - २०
दिनांक – ०८/०८/२०१८
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव

दि.१५/८/२०१८ रोजी भारतीय स्वतांत्र्य दिनानिमित्त सार्वजनिक सुट्टी असल्याने दि.१५/८/२०१८ ची मा.स्थायी समिती सभा दि.१४/८/२०१८ रोजी दु.२.०० वा आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०३६ विषय क्रमांक - २१
दिनांक – ०८/०८/२०१८ विभाग–यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वायसीएमएच/७/कावि/४९०/२०१८ दि.०६/०८/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयामध्ये दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात २९ वरिष्ठ निवासी व६३ कनिष्ठ निवासी पदे सहा महिने कालावधीकरीता भरणेकामी जाहिरात क्र.७५ प्रसिध्द केली असता उपस्थित झालेल्या उमेदवारांच्या मुलाखती/ लेखी परिक्षा दि.२८/७/२०१८ रोजी घेऊन त्यामध्ये पात्र झालेल्या २२ वरिष्ठ निवासी व ४७ कनिष्ठ निवासी डॉक्टरांची निवड व प्रतिक्षा यादी तयार केली असून ती सोबतचे प्रपत्र अ व ब मध्ये नमुद केलेली आहे. सदर निवड केलेल्या वरिष्ठ व कनिष्ठ निवासी डॉक्टरांना सहा महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात एकत्रीत मानधनावर नेमणूक देणेबाबत व त्यानुसार येणा-या मानधन खर्चास तसेच जाहिरात क्र.७५ दि.२०/७/२०१८ नुसार वरिष्ठ निवासी व कनिष्ठ निवासी ही पदे पुर्ण क्षमतेने भरली नसल्याने सदरची २३ रिक्त पदे यापुढे सहा महिनेकरिता Walk In Interview ने भरणेस व त्यांचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०३७ विषय क्रमांक - २२
दिनांक – ०८/०८/२०१८ विभाग – उद्यान
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/६/कावि/८३१/२०१८ दि.०७/०८/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र. १/०१/२०१८-१९ अन्वये जिजाऊ पर्यटन केंद्र, भाग १ व २,पार्वती उद्यान देखभाल व संरक्षण करणेकामी मे.सदिच्छा कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा निविदा र.रु.४१,१४,८००/- (अक्षरी र.रू.एक्केचाळीस लाख चौदा हजार आठशे फक्त)पेक्षा १२.६०% टक्के कमी र.रु.३५,९६,३३५/- दराने स्विकृत करणेत आली असुन प्रस्तुतकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०३८ विषय क्रमांक - २३
दिनांक – ०८/०८/२०१८ विभाग – स्थापत्य उद्यान
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.स्था.उ/कावि/२६७/२०१८ दि.०६/०८/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

स्थापत्य उद्यान विभागाकडील प्रभाग क्र.४१ सन २०१७-१८ साठी डॉ बाबसाहेब आंबेडकर व महात्मा फुले जयंती महोत्सवासाठी मंडप व्यवस्था करणेकामी सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात पान क्र.१३८ अ.क्र.१९ वर र.रू.८,००,०००/- इतकी तरतूद होती. सदर तरतुदीच्या दीड पट मर्यादेतच अंदाजपत्रक तयार करून र.रू.११,२०,३६०/- ची निविदा काढणेत आली आहे. परंतु प्रत्यक्ष काम करताना कामाचे परिमाणात वाढ झाली असून या कामासाठी र.रू.१९,३४,५१५/- सुधारित खर्च आहे. (र.रू.१९,३४,५१५ – ८,७३,८८१ = १०,६०,६३४/- वाढीव) या कामाचे र.रू.१९,३४,५१५/- चे सुधारित खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०३९ विषय क्रमांक - २४
दिनांक – ०८/०८/२०१८ विभाग – अ क्षेत्रीय, स्थापत्य
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.अति. आयुक्त (१) यांचे जा.क्र.अक्षे/स्था/कावि/९३०/२०१८ दि.०८/०८/२०१८

मा.अति. आयुक्त (१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अ क्षेत्रीय कार्यालयातील स्थापत्य विभागामार्फत विविध

विकास कामे करण्यात येतात. त्या अंतर्गत प्रभाग क्र.२७ मोरवाडी येथील आनंदधाम स्माशनभुमीचे नुतनीकरणाचे काम करणेचे प्रयोजन आहे. तसेच सदर कामाबाबत मा.नगरसदस्य /नगरसदस्या यांची मागणी आहे. सदरचा प्रकल्प वैशिष्ठपुर्ण असल्याने तांत्रिक दृष्ट्या सदर प्रकल्पांची संकल्प चित्रे, प्रकल्प आराखडे तयार करणे, बांधकाम परवानगी घेणे, पुर्वगणनपत्रक, निविदा विषयक कामे करणे इ. निविदा पुर्व कामे करणेकरिता आर्किटेक्ट (वास्तु विशारद) ची नेमणुक करणे आवश्यक आहे. तसेच तांत्रिक दृष्ट्या आराखड्या प्रमाणे काम करुन घेणे त्यांचे मोजमापे घेऊन देयक तयार करणे, प्रकल्पांच्या दैनंदिन कामावर देखरेख करणे, निविदा पश्चात कामे करणे आवश्यक आहे.मनपाचे अभियंत्याकडील इतर कामाचा व्याप पाहता व प्रकल्पाची वरील दैनंदिन कामे परिणामकारक होणे करिता सदर प्रकल्पासाठी निविदापुर्व व निविदा पश्चात आर्किटेक्ट/सल्लागार असणे अत्यंत आवश्यक आहे.सदर बाबत मनपाच्या अधिकृत वेबसाईटवर आर्किटेक्ट/सल्लागार यांचेकडुन दरपत्रक मागविणेसाठी दि.२०/०६/२०१८ रोजी कोटेशन नोटीस प्रसिध्द करणेत आली होती. या विभागाकडून पाठविलेल्या ई मेलची प्रिंट व त्यावेळी संगणक विभागाने प्रसिध्द केलेल्या दरपत्रकाचे पृष्ठांची प्रिंट स्पेसिफिकेशन यांच्या प्रिंटस सोबत जोडलेल्या आहेत.सिलबंद लिफाफ्यात दरपत्रक या विभागाकडे सादर करण्याची अंतिम दि.२२/०६/२०१८ असुन दि.२२/०६/२०१८ रोजी पर्यंत एकुण ३ सिलबंद कोटेशन प्राप्त झाली आहेत .सदर कोटेशन दि.२६/०६/२०१८ रोजी ३.०० वाजता उघडण्यात आले असुनत्याचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे.सदर तक्त्यानुसार मे.किमया असोसिएटस यांनी आर्किटेक्ट लघुत्तम दर १.९९%(जीएसटी सोडुन)सादर केल्याचे दिसुन येते, तरी मे. किमया असोसिएटस यांनी लघुत्तम दर सादर केल्याने त्यांची सदर कामाच्या निविदापुर्व व निविदा पश्चात आर्किटेक्ट म्हणुन नेमणुक करणेस हरकत वाटत नाही. सबब, प्रभाग क्र.२७ मोरवाडी येथील आनंदधाम स्माशनभुमीचे नुतनीकरणाचे काम करणेकामी मे.किमया असोसिएटस यांची लघुत्तम दर १.९९%(जीएसटी सोडुन) नुसार निविदापुर्व व निविदा पश्चात आर्किटेक्ट म्हणुन नेमणुक करणेबाबत व त्याकामी होणारी फि १.९९%(जीएसटी सोडुन) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०४० — विषय क्रमांक - २५

दिनांक – ०८/०८/२०१८ — विभाग – आरोग्य मुख्यालय

सूचक – मा.विलास मडिगेरी — अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.अति.आयुक्त (२) यांचे जा.क्र.आमुका/२/कावि/७१२/२०१८ दि.०७/०८/२०१८

मा.अति.आयुक्त (२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका व युनिट्रॅक सोल्युशन्स प्रा.लि.यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १७ ऑगस्ट ते १९ ऑगस्ट २०१८ या कालावधीमध्ये स. ११.०० ते सायं. ०७.०० या वेळेत

आटो क्लस्टर प्रदर्शन हॉल, चिंचवड-४११०१९ येथे घनकचरा व्यवस्थापन विषयक प्रदर्शन भरविण्यात येणार असुन,प्रदर्शनामध्ये घनकच-यावर प्रक्रिया करणा-या अनेक नामांकित संस्था सहभागी होणार आहेत. तसेच शहरातील गृहसंकुलातील नागरीक मोठया प्रमाणात या ठिकाणी भेट देणार आहेत. या प्रदर्शनामुळे गृहनिर्माण संस्थांना तसेच व्यावसायिक आस्थापनांना ओल्या व सुक्या कच-याची स्थानिक पातळीवर विल्हेवाट लावणे शक्य होणार आहे. दिनांक १६ ऑगस्ट (पुर्व तयारीसाठी ०१ दिवस) व दिनांक १७ ते १९ ऑगस्ट २०१८ या ०३ दिवस कालावधीमध्ये सदर प्रदर्शन असे एकूण ०४ दिवसाचे रु.रु.१०,१७,७५०/- भाडे आटो क्लस्टर डेव्हलपमेंट ऍन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, चिंचवड-४११०१९ यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०४१ विषय क्रमांक - २६

दिनांक – ०८/०८/२०१८ विभाग – आकाशचिन्ह व परवाना

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आप/७/कावि/१२/२०१८ दि.०८/०८/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

महानगरपालिकेच्या सार्वजनिक जागेवर, रस्त्यावर, चौकाचौका मध्ये लावणेत येणा-या फ्लेक्स, हँडबिल्स, कागदी भिंतीपत्रके इत्यादी ठिकाणी अशा प्रकारचे जाहिरात करणेस महानगरपालिकेकडुन कोणत्याही प्रकारची परवनगी दिली जात नाही. सदर ठिकाणी लावणेत येणा-या अशा प्रकारच्या जाहिरात फ्लेक्सवर अतिक्रमण विभागाकडुन कारवाई केली जाते. शहरामध्ये महानगरपालिकेच्या मिळकतीवर ब-याच ठिकाणी हँडबिल्स, कागदी भिंतीपत्रके इत्यादी लावले जातात. त्यामुळे शहराचे विद्रुपीकरण होते. यावर अनेक वेळा मा.स्थायी समितीमध्ये चर्चा केली जाते. वर्तमानपत्रामध्ये सुध्दा अशा प्रकारच्या बातम्या येतात. अशा प्रकारच्या अनधिकृत लावणेत येणा-या जाहिरातदारांना आळा घालणेसाठी व त्यावर नियंत्रण येणेसाठी कारवाई करणेबाबत धोरण ठरविणेस मा.आयुक्त सो. यांनी सुचना दिलेल्या आहेत. महानगरपालिकेच्या मिळकतीवर चिकटविण्यात, लावणेत येणा-या हँडबिल्स, कागदी भिंतीपत्रके यावर कारवाई करावयाची झालेस हे काढुन सदरची जागा पुर्ववत करणेस येणा-या खर्चाचे अंदाजपत्रक स्थापत्य विभागाकडुन दिनांक 4/8/2018 रोजी च्या पत्रान्वये मागविणेत आलेले आहेत. त्यांनी सदर कामासाठी र.रु.375/- प्रती चौ.मी.इतका दर कळविलेला आहे परंतु सदरचा दर हा फक्त लावलेली जाहिरात काढणे व ती जागा पुर्ववत करणे याचेकरीता आहे. ज्या व्यक्तीने/जाहिरातदाराने जाहिरात लावलेली आहे त्यांना प्रशमन शुल्क म्हणुन र.रु.375/- प्रती चौ.मी. इतकी रक्कम आकारावी असे मत आहे. अशी मिळुन र.रु.750/- प्रती चौ.मी.इतका दर आकारावा लागेल. अशा प्रकारच्या हँडबिल्स,कागदी भिंतीपत्रके इत्यादी वर कारवाई करणेबाबत

तत्कालीन आयुक्त सो यांनी आदेश क्रमांक-आ/7/कावि/418/2013 दि.14/10/2013 अन्वये आरोग्य निरिक्षक यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. परंतु त्यांच्याकडुन किती प्रशमन शुल्क आकारावा? याबाबत रक्कम ठरविणेत आलेली नव्हती. सदरची रक्कम निश्चित करणेस धोरण ठरविणे आवश्यक आहे.सदर धोरणाची अंमलबजावणी करताना संबंधितांना प्रथम नोटीस देऊन जाहिरात काढणेस व सदरची जागा पुर्ववत करणेस फर्मावणेत यावे. नोटीस कालावधीमध्ये जाहिरात काढुन न घेतलेस त्यांचेवर कारवाई करणेत यावी. सबब महानगरपलिकेच्या मिळकतीवर व सार्वजनिक ठिकाणी अनधिकृतपणे लावणेत येणा-या हॅंडबिल्स, कागदी भिंतीपत्रके लावून शहराचे विद्रुपीकरण करणा-या जाहिरात धारकांना र.रु.750/- प्रती चौ.मी. इतका प्रशमन शुल्क आकारणेस मान्यता देणेकामी मा.महापलिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/९८०/२०१८
दिनांक - ०९/०८/२०१८

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(क्र. अक्षेका/आ/२/कावि/३९०/२०१८ दि.३१/०७/२०१८ विषय क्र.१३ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य विभाग
विषय पत्र क्र.अक्षेका/आ/२/कावि/३९०/२०१८ दि.३१/०७/२०१८
प्रपत्र अ

| अ.क्र | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारीख | कामाचा आदेश/पत्र क्रमांक | कामाचा आदेश/पत्र दिनांक | निविदा रक्कम | स्विकृत दर | खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे.सुपरफाईन एंटरप्रायझेस | ९/२०१८ १९ आरोग्य व क्षेत्रीय कार्यालय | पावसाळी गटर्स चेंबर्स साफसफाई करणे व निघणारा गाळ, कचरा राडारोडा, झाडेझुडपे इ. वाहतूक करणे | दि. २५/०५/२०१८ | क्र.अक्षेका/आ/२/कावि/२३५/२०१८ | दि. २८/०५/२०१८ | | ४८.७९ % कमी | ६,९५,४३८/ |

टिप : उपरोक्त मंजूर दर ४८.७९% कमी दर व क्षेत्रीय कार्यालयाकडील मंजूर दराने काम केले आहे.

क्षेत्रीय अधिकारी
अ क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४४

(क्र.वायसीएमएच/७/कावि/४९०/२०१८ दि.६/८/२०१८ विषय क्र.२१ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-४११०१८
यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय

निवड समितीने शिफारस केलेल्या निवडयादी नुसार तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावर
६ महिने कालावधीसाठी वरीष्ठ निवासी पदे मानधनावर भरणेकामी निवड व प्रतिक्षा यादी
(नेमणुक कालावधी दिनांक /०८/२०१८ ते दिनांक /०२/२०१९ अखेर ६ महिने)

प्रपत्र "अ"

वरीष्ठ निवासी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | नियुक्तीचा विभाग | प्रवर्ग | मानधन प्रति महिना रु.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ.अजित साठे | मेडीसीन | खुला निवड -१ | ५५०००/- |
| २ | डॉ. सुरवसे अंकित अशोक | सर्जरी | खुला निवड -१ | ५५०००/ |
| ३ | डॉ. म्हसे अक्षय चांगदेव | सर्जरी | खुला निवड -२ | ५५०००/ |
| ४ | डॉ. अमोल पुरुषोत्तम मुळे | सर्जरी | खुला प्रतिक्षा -१ | ५५०००/ |
| ५ | डॉ. सौरभ वंजी पाटील | गायनेंक | खुला निवड -१ | ५५०००/ |
| ६ | डॉ.चौधरी भुषण सुभाष | गायनेंक | खुला निवड-२ | ५५०००/ |
| ७ | डॉ. मोह्रोड प्राजक्ता विजय | गायनेंक | अनुसुचित जाती निवड-१ | ५५०००/ |
| ८ | डॉ. अमोघ अरुण झवर | अस्थिरोग | खुला निवड -१ | ५५०००/ |
| ९ | डॉ. अजिंक्य दिपक अचलारे | अस्थिरोग | खुला निवड -२ | ५५०००/ |
| १० | डॉ. ओंकार प्रताप कुलकर्णी | अस्थिरोग | खुला प्रतिक्षा -१ | ५५०००/ |
| ११ | डॉ. राजेंद्र तुकाराम साखरेकर | अस्थिरोग | अनुसुचित जाती निवड-१ | ५५०००/ |
| १२ | डॉ. सुमित सतीश शिंदे | अस्थिरोग | अनुसुचित जाती प्रतिक्षा-१ | ५५०००/ |
| १३ | डॉ. आदित्य सतीश कुलकर्णी | बालरोग | खुला निवड -१ | ५५०००/ |
| १४ | डॉ.निमिशा मोनी ईनोस | बालरोग | खुला निवड-२ | ५५०००/ |
| १५ | डॉ. भागवत गजानन खिलारे | भुलशास्त्र | खुला निवड-१ | ५५०००/ |
| १६ | डॉ.सायली राज बोंडे | भुलशास्त्र | खुला निवड-२ | ५५०००/ |
| १७ | डॉ.संकल्प सोमेश्वर निर्मल | मानसोपचार तज्ञ | खुला निवड-१(ई.मा.व) | ५५०००/ |
| १८ | डॉ. अश्विनी शिवाजी हंडाळ | कान,नाक,घसा | खुला निवड-१(भ. ज. क) | ५५०००/ |
| १९ | डॉ. सुरज बालाजी गिरी | कान,नाक,घसा | खुला प्रतिक्षा -१ | ५५०००/ |
| २० | डॉ. सरस्वतीराणी शिरीष पवार | त्वचारोग | खुला निवड-१ | ५५०००/ |
| २१ | डॉ. अभिजीत राजेंद्र मिसाळ | नेत्ररोग | खुला निवड-१ | ५५०००/- |
| २२ | डॉ. भुषण संजय गांधी | नेत्ररोग | खुला प्रतिक्षा-१ | ५५०००/- |

अति (१) आयुक्त.
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी.४११०१८-

D/Gaikwad Sir/मानधन/वरिष्ठ व कनिष्ठ निवासी भरती सप्टे २०१७

20

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी- ४११०१८

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय

निवड समितीने शिफारस केलेल्या निवडयादी नुसार तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावर ६ महिने कालावधीसाठी कनिष्ठ निवासी पदे भरणेकामी निवड व प्रतिक्षा यादी

नेमणुक कालावधी दिनांक /०८/२०१८ ते दिनांक /०२/२०१९ अखेर ६ महिने

प्रपत्र "ब"

कनिष्ठ निवासी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | नियुक्तीचा विभाग | प्रवर्ग | मानधन प्रति महिना र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. अतुल बन्सी उवाळे | मेडीसीन | अनुसुचित जाती निवड- १ | ४५०००/ |
| २ | डॉ. सचिन दिगंबर इंगळे | मेडीसीन | अनुसुचित जाती निवड- २ | ४५०००/- |
| ३ | डॉ. आसाराम रंगनाथ दोडताले | मेडीसीन | भटक्या जमाती क निवड-१ | ४५०००/ |
| ४ | डॉ. दिनेश वैजनाथ माळे | मेडीसीन | भटक्या जमाती ब निवड-१ | ४५०००/- |
| ५ | डॉ. विवेक शिवराम पवार | मेडीसीन | विमुक्त जाती अ-निवड-१ | ४५०००/ |
| ६ | डॉ. कल्पना महादेव पाटील | मेडीसीन | इतर मागास वर्ग निवड-१ | ४५०००/- |
| ७ | डॉ.योगेश्वर सतिश भावसार | मेडीसीन | इतर मागास वर्ग निवड-२ | ४५०००/ |
| ८ | डॉ. रोहीत रामराव नवटके | मेडीसीन | खुला निवड-१ | ४५०००/- |
| ९ | डॉ. दिप्ती सोमनाथ शिवणकर | मेडीसीन | खुला निवड-२ | ४५०००/ |
| १० | डॉ. पाटील कल्याणी अजबराव | मेडीसीन | खुला निवड-३ | ४५०००/- |
| ११ | डॉ. शिंदे सिध्दनाथ जी. | मेडीसीन | खुला निवड-४ | ४५०००/ |
| १२ | डॉ. सुजित अर्जुन कल्हापुरे | मेडीसीन | खुला निवड-५ | ४५०००/- |
| १३ | डॉ. केदार दत्तात्रय कुलकर्णी | मेडीसीन | खुला निवड-६ | ४५०००/ |
| १४ | डॉ. संदेश संब शेटकर | मेडीसीन | खुला निवड-७ | ४५०००/- |
| १५ | डॉ. अशोक शामराव मुंडे | मेडीसीन | खुला निवड-८ | ४५०००/ |
| १६ | डॉ. संजय रघुनाथ जाधव | मेडीसीन | खुला निवड-९ | ४५०००/- |
| १७ | डॉ. गणेश बळीराम नागरगोजे | सर्जरी | खुला निवड -१ | ४५०००/ |
| १८ | डॉ. अमृता साहेबराव पवार | सर्जरी | खुला निवड -२ | ४५०००/- |
| १९ | डॉ. पद्मनाभ नितीन देशपांडे | सर्जरी | खुला निवड -३ | ४५०००/ |
| २० | डॉ. पाटील ज्ञानेश मोहन | सर्जरी | इतर मागास वर्ग निवड-१ | ४५०००/- |
| २१ | डॉ.स्वरांजली मदनराव शेवाळे | गायनॅक | अनुसुचित जाती निवड-१ | ४५०००/ |
| २२ | डॉ. प्रतिक्षा दत्तात्रय सुरुशे | गायनॅक | इतर मागास वर्ग निवड-१ | ४५०००/- |
| २३ | डॉ.उपलेश संतोष महाजन | गायनॅक | इतर मागास वर्ग निवड-२ | ४५०००/ |
| २४ | डॉ. अभिजीत सुधीर जाधव | गायनॅक | खुला निवड-१ | ४५०००/- |
| २५ | डॉ. ममता दत्तात्रय पारडे | गायनॅक | खुला निवड-२ | ४५०००/ |
| २६ | डॉ. आदिती प्रदिप नंदी | गायनॅक | खुला निवड-३ | ४५०००/- |
| २७ | डॉ. सावी अविनाश मुंढे | गायनॅक | खुला निवड-४ | ४५०००/ |
| २८ | डॉ. काशीबटला रोहीनी पल्लवी | गायनॅक | खुला निवड-५ | ४५०००/- |
| २९ | डॉ. स्वप्रिल दादाजी पाटील | अस्थिरोग | खुला निवड-१ | ५००००/- |
| ३० | डॉ. रूषिकिरण रोहिदास पवार | अस्थिरोग | खुला निवड-२ | ५००००/ |
| ३१ | डॉ. गणेश हानुमान काकडे | अस्थिरोग | खुला प्रतिक्षा -१ | ५००००/ |
| ३२ | डॉ. निखील मुकुंद इंगळे | अस्थिरोग | अनु.जाती निवड -१ | ५००००/ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३३ | डॉ. पंकज सुरेश बुरकुटे | नेत्ररोग | खुला निवड-१ | ५००००/- |
| ३४ | डॉ. सागर दिपक पाटील | नेत्ररोग | खुला प्रतिक्षा-१ | ५००००/- |
| ३५ | डॉ. विनया नामदेव घनवट | भुलतज्ञ | खुला निवड-१ | ५००००/- |
| ३६ | डॉ.प्रविण बजरंग चव्हाण | भुलतज्ञ | खुला निवड-२ | ५००००/- |
| ३७ | डॉ. राहुल मोहनराव बांड | भुलतज्ञ | खुला निवड-३ | ५००००/- |
| ३८ | डॉ. गजानन गुणाजीराव राऊत | भुलतज्ञ | खुला प्रतिक्षा-१ | ५००००/- |
| ३९ | डॉ. रुपाली दत्तात्रय महाडीक | भुलतज्ञ | खुला प्रतिक्षा२ | ५००० /- |
| ४० | डॉ. गायत्री प्रदिप सराफ | मानसोपचार | खुला निवड-१ | ५००००/- |
| ४१ | डॉ. श्वेता अशोकसिंग रजपुत | कान,नाक,घसा | खुला निवड-१ | ५००००/- |
| ४२ | डॉ. सागरीका शशिकांत सातव | कान,नाक,घसा | खुला प्रतिक्षा-१ | ५००००/- |
| ४३ | डॉ. मयुरा विजय रेटे | रेडीओलॉजिस्ट | खुला निवड-१ (इ.मा.व) | ५००००/- |
| ४४ | डॉ. तृप्ती आनंदगीर गोसावी | दंतरोग | खुला निवड-१ | ४५०००/- |
| ४५ | डॉ. प्रीति विजय मानकर | दंतरोग | खुला प्रतिक्षा-१ | ४५०००/ |
| ४६ | डॉ. सुषमा शंकर कावळे | दंतरोग | अनु.जाती निवड-१ | ४५०००/ |
| ४७ | डॉ. अक्षय लक्ष्मण सोनवणे | दंतरोग | अनु.जाती प्रतिक्षा-१ | ४५०००/ |

आदेश क्र. वायसीएमएच/७/कावि/४९०/२०१८
दिनांक - ०६/०८/२०१८

अति (२) आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी [illegible]